गाझे लिहून देणार, याचे बँकेतील खात्यात वटले नाही, तर सदरची नोंदणीकृत विक्री ही रद्द समजण्यात येईल व त्यानुसार मी लिहून घेणार यांचेविरुध्द कायदेशीर कार्रवाई करण्याचा अधिकार प्राप्त लिहून देणार म्हणून राहील. तरी सदर्हु शेत जमिनीची विक्री खालील अटी व शर्तीवर करीत आहेतः-

१. सदर शेत जमीनीवर कोणतेही अथवा कोणाचेही खाजगी कर्ज, बोझा व सरकारी कर्ज अथवा गहाण इत्यादी नाही अथवा कोणासही गहाण खत, दान पत्र, बक्षीस अथवा विक्रीचा करार किंवा विक्री केली नाही इत्यादी कोणासही करून दिलेले नाही आणि तसे आढळल्यास मी, लिहून देणार, यास संपूर्णतः जबाबदार राहील व ते लिहून घेणा-यास कोठल्याही प्रकारे तोशिस लागु देणार नाही अथवा खर्च करावा लागणार नाही.

२. सदर शेत जमीनीवर कोणाचेही अतीक्रमण नाही अथवा कुळ नाही असे आढळल्यास मी, लिहून देणार ते स्वखर्चाने दुर करतील.

३. सदर शेत जमीन सरकारी अगर निम सरकारी कामासाठी ॲक्वायर किंवा रिक्वायर केलेली नसुन त्यासंबंधिची नोटीस् आज पावेतो लिहून देणा यास मिळालेली नाही.

४. सदर शेत जमीन कायदेशिर रित्या लिहुन घेणा-याच्या नावे होण्यासाठी ज्याही प्रकारची मदत करावी लागेल जसे कागद पत्रे, शपथ पत्र, अर्ज सादर करावे लागतील ती सर्व मदत लिहून देणारे करतील व तसेच या विक्रीच्या वेळी सर्व मुळ कागदपत्र / दस्तऐवज लिहुन घेणा-याचे स्वाधीन करू.

५. सदर शेत जमीनीवर कोणत्याही प्रकारचा खाजगी, सहकारी, सरकारी, निमसरकारी कर्ज लिहून देणा-याने करून ठेवलेले नसुन कोठलाही टॅक्स, अथवा इलेक्ट्रीकल बिल, पाण्याचे बिल इत्यादी आता पर्यंत लिहून देणा-याने पूर्णपणे दिलेले असुन सदर शेत जमिनीवर कोणाचाही कोठल्याही प्रकारचा बोझा नाही. तसे आढळून आल्यास सदर जमिन लिहून देणारे स्वखर्चाने त्या बोझ्यातून मुक्त करतील. तसेच सदर जमीन बाबत कुठल्याही प्रकारचा दावा न्याय प्रविष्ट नसुन सदर मालमत्ता विकणेबाबत कुठल्याही न्यायालयाचा त्या संबंधी स्थगनादेश नाही.

६. प्रस्तुत शेत जमीनीचा ताबा विक्रीच्या दिवशी म्हणजेच आज रोजी लिहुन देणा यास दिला आहे व तसे त्यास मंजुर आहे व लिहून घेणार यांनी सदर शेतजमीनीचा ताबा आज घेतला आहे.

हवेली
८०५६ / २०२१
८ / २५

७. सदर जमीन नागपूर महानगर प्रदेश विकास योजनेअंतर्गत समाविष्ट असून सदर प्राधिकरणाचे जावक पत्र क्रं. नर/भान/नामप्रविप्रा/१२४२९, दि.१४/१२/२०२१ चे भाग नकाशा प्रमाणपत्रानुसार, खसरा क्रं. ८९/१, मौजा सुकळी (गुपचुप), तहसील हिंगणा व जिल्हा नागपूर, ही शेतजमीन 'निवासी, १८.०० मी. रस्ता रुंदीकरण', असा भाग नकाशा 'झोन दाखला', प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

८. तसेच लिहुन घेणार यांचे नावे आधीच शेतजमीन असल्यामुळे मुंबई वहिवाटीचे कुळ व शेत जमीनी (विदर्भ विभाग) कायदा, १९५८, चे कलम ८९ लागु होत नाही. तसेच महाराष्ट्र नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम १९६१ चे कलम ८ व ९ अन्वये लिहून घेणार व लिहून देणार ह्यांनी कमाल क्षेत्रापेक्षा अधिक जमीन धारण केलेली नाही. तसेच उपरोक्त मिळकत खरेदी करतांना खरेदीदाराने हस्तांतरण कलम ४१ नुसार संबंधित मिळकतीच्या मालकी संबंधी तसेच वारसदार, हक्कदार व दावेदार ह्यांचे संबंधित, मालकी हक्कासंबंधी खात्री करूनच ही जमीन / मिळकत विकत घेत आहे.

९. सदर शेतजमीनीवर ना. ज. क. धा. अधिनियम अंतर्गत कुठलेही निर्बंध नाही, तसेच सदर जमीन कोतवाल इंग, भुदान संबंधित नाही. खरेदीदार व विक्रीकर्ता दोघेही आदीवासी नसुन सदर जमीनीवर खरेदी विक्रीसाठी न्यायालयीन मनाई हुकुम नाही.

१०. सदर शेत जमीनीच्या विक्रीचा व्यवहार करतांनाचा येणारा सर्व खर्च जसे स्टॅम्प ड्युटी, नोंदणी फी, वकील फी इत्यादी हे लिहून घेणार करतील.

आजपासून या स्थावर मालमत्तेवरील माझा मालकी हक्क व अधिकार नष्ट झाला असून, तुम्ही या स्थावर मालमत्तेचे पूर्णपणे मालक व कब्जेदार झालेले आहात, यापुढे या स्थावर मालमत्तेचा तुम्ही तुमचे मर्जीप्रमाणे उपयोग फायदा घेत जाणे या स्थावर मालमत्तेवरील वहीवाट व विल्हेवाट करण्याचा तुम्हांस पूर्णपणे अधिकार दिला आहे. तसेच आजपासून यावर येणारा शेतसारा इत्यादी तुम्ही तुमचे नांवानी भरत जावा, सरकारी व निमसरकारी कागदोपत्री तुम्ही तुमचे नांव दर्ज करावे व ते मी दर्ज करून देईन.

करिता हे विक्रीपत्र मी माझा कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार राखून न ठेवता तुमचे अधिकारात आमचे राजीखुशीने तुम्हांस लिहून दिले असुन यावर वाचून व समजावून घेवून खालील साक्षदारासमक्ष मी माझी स्वाक्षरी केली असुन हे मला व माझे इतर इस्टेट वारसांनास लागू आहे.

हगन
१०७६ / २०२१
१० / २८